**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७३ दिनांक २७/१२/२०२४**

# ४९ वा कोंकण परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा- २०२४ कार्यक्रम

३५ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा ही जानेवारी २०२५ मध्ये घेण्याचे नियोजीत आहे. त्याअनुषंगाने एकुण १३ पोलीस परिक्षेत्र/पोलीस आयुक्तालय यामधील चांगल्या, निपुण व गुणी खेळाडुंचे संघ निवडुन त्यांना महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी पाठविण्यात येतात. सदर स्पर्धेच्या अनुषंगाने ४९ व्या कोंकण परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी या वर्षी पालघर जिल्हा पोलीस दलाकडे सोपविण्यात आलेली आहे. सदर स्पर्धा या दिनांक २८/१२/२०२४ ते ०३/०१/२०२५ दरम्यान होणार आहेत.

४९ व्या कोंकण परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेमध्ये १) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, २) मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय, ३) ठाणे ग्रामीण, ४) सिंधुदुर्ग, ५) रायगड, ६) रत्नागिरी, ७) पालघर या पोलीस घटकाकडील सघांचा समावेश आहे. सदर स्पर्धेमध्ये अॅथलेटिक्स, वेटलिफ्टींग, पॉवरलिफ्टींग, कुस्ती, जुडो, तायक्वांदो, वु-शु, बॉक्सींग, हॉकी, फुटबॉल, हँडबॉल, हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी व जलतरण या खेळांचा समावेश असणार आहे. सदर स्पर्धेकरीता नवी मुंबई आयुक्तालयाचे ०९ अधिकारी, ३२ महिला खेळाडु, पुरुष खेळाडु-१५१, रत्नागिरी पोलीस दलाचे ०१ अधिकारी, २० महिला खेळाडु, पुरुष खेळाडु-४५, मिरा- भाईंदर,वसई-विरार आयुक्तलयाचे ०४ अधिकारी, २५ महिला खेळाडु, पुरुष खेळाडु-१०२, ठाणे ग्रामीण पोलीस दलाचे ०४ अधिकारी, ३१ महिला खेळाडु, पुरुष खेळाडु-८०, रायगड पोलीस दलाचे ०८ अधिकारी, ३१ महिला खेळाडु, पुरुष खेळाडु-११०, सिंधुदुर्ग पोलीस दलाचे ०३ अधिकारी, २५ महिला खेळाडु, पुरुष खेळाडु-६५ व पालघर पोलीस दलाचे  ०५ अधिकारी, ३० महिला खेळाडु, पुरुष खेळाडु-९० असे एकुण ८७१ पोलीस खेळाडु या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. सदर स्पर्धा नि:पक्षपाती व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी एकुण १६० पंचांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धा या ०४ ठिकाणी घेण्यात येणार असुन त्यामध्ये पोलीस परेड मैदान कोळगांव याठिकाणी अॅथलेटिक्स, वेटलिफ्टींग व पॉवरलिफ्टींग या स्पर्धा होणार आहेत. जिल्हा क्रिडा संकुल या ठिकाणी कुस्ती, जुडो, तायक्वांदो, वु-शु, बॉक्सींग या स्पर्धा होणार आहेत. तारापुर विदया मंदिर या ठिकाणी  हॉकी, फुटबॉल, हँडबॉल, हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी या स्पर्धा होणार आहेत तसेच विराज इंटरनॅशनल स्कुल, कुरगांव याठिकाणी जलतरण स्पर्धा आयोजीत केलेली आहे.

सदर स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्याकरीता मा. श्री संजय दराडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, मा. श्री बाळासाहेब पाटील,पोलीस अधीक्षक, पालघर,मा. श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री सुहास व्हनमाने, जिल्हा क्रिडा अधिकारी व पालघर जिल्हयातील विविध क्रिडा असोशिएशन यांनी बाहेरुन येणाऱ्या खेळाडु व पंचांची कोणतीही गैरसोय होणार नाही याबाबत योग्य ते नियोजन करुन सर्व घटकातील सघांना शुभेच्छा दिलेल्या आहेत.